दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर   वर्ष ४ थे   अंक १८३ वा  शनिवार दि.०४ जानेवारी २०२५   पृष्ठे ४   स्वागत मूल्य २ रू.







## लातूर ग्रामीण मतदार संघात भाजपाचे सदस्य नोंदणी अभियान यशस्वी करावे- आ. रमेशआप्पा कराड यांचे आवाहन




लातूर :- संपूर्ण राज्यात भाजपा सदस्यता अभियान सुरू झाले असून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात पक्षश्रेष्ठीने दिलेल्या उद्दिष्टाहून अधिक सदस्यांची नोंदणी करून प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हे अभियान यशस्वी करावे असे आवाहन लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सदस्यता अभियान राबवले जात असून हे अभियान लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात यशस्वी करण्यासाठी मतदार संघातील प्रमुख पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख आणि बूथ प्रमुखांची व्यापक बैठक आमदार रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर येथील भाजपा संवाद कार्यालयात शुक्रवारी दुपारी झाली. यावेळी किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, रेणापूर तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

सर्वाधिक सदस्य असलेला जगातील एकमेव भारतीय जनता पार्टी हा राजकीय पक्ष असून या पक्षाचे नेते देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात लाखो कार्यकर्ते कार्यरत आहेत असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, भाजपा राष्ट्रीय पक्षश्रेष्ठनी यावेळी देशभरात २१ कोटी सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट ठेवले आहे त्यानुसार प्रत्येक विधानसभा मतदार संघात ६० हजार सदस्य करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे.

निवडणुकीत भाजपा यश अपयश निकाल काहीही लागला तरी दुसऱ्या दिवसापासून पक्ष कायम कामात आहे लातूर ग्रामीण मतदार संघात भाजपाचा विजय होईल हे कोणालाही शक्य वाटत नव्हते मात्र कार्यकर्त्याच्या मेहनतीतून हे शक्य झाले पंधरा वर्षाच्या संघर्षाला आणि मेहनतीला फळ आले असे सांगून येणारा काळ हा कार्यकर्त्यांच्या निवडणुकीचा काळ आहे जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपंचायत, ग्रामपंचायत, सोसाट्या या निवडणुकीत भाजपाच्या कार्यकर्त्याला यश मिळाले पाहिजे यासाठी सदस्यता नोंदणी अभियान महत्त्वपूर्ण असल्याचे बोलून दाखविले.

मतदारसंघातील भाजपाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी शक्ती केंद्र प्रमुख आणि बूथ प्रमुख यांनी सदस्यता नोंदणी अभियानात जातीने लक्ष घालून सर्वांना सोबत घेऊन प्रत्येक बूथवर घरोघरी जाऊन किमान दोनशे भाजपाचे सदस्य करावेत आणि पक्षश्रेष्ठीने दिलेल्या उद्दिष्टाहून अधिक किमान ७५ हजार भाजपा सदस्य लातूर ग्रामीण मतदार संघातून झाले पाहिजेत यासाठी सर्वांनी मेहनत घ्यावी अशी सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी यावेळी बोलताना केली.

निवडणूक झाली, निकाल लागला, सर्वांचे स्वप्न साकार झाले आता मतदार संघातील सर्व जनता आपली आहे, आपण जनतेचे आहोत असे समजून भाजपाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी सर्वांना सोबत सार्वजनिक, सामाजिक आणि वैयक्तिक कामे करावीत. जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करून न्याय देण्याचा प्रयत्न करावा असेही यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले. प्रारंभी दशरथ सरवदे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले.

भाजपा सदस्य नोंदणी अभियान लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात यशस्वी व्हावे यासाठी लातूर आणि रेणापूर या दोन्ही तालुक्यांसाठी स्वतंत्रपणे अभियान समिती नियुक्त करण्यात आली असून रेणापूर तालुक्यांसाठी संयोजक महेश गाडे, सहसंयोजक अमर चव्हाण, अनुसया फड, राजकुमार मानमोडे, श्रीकृष्ण पवार, अजय दौंड यांची तर लातूर तालुक्यासाठी संयोजक सुरज शिंदे, सहसंयोजक शितल पाटील, संजय ठाकूर, सुरेखा पुरी, शामसुंदर वाघमारे, बालाजी गवळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## सावित्रीबाई फुले यानींच स्त्रियांना सन्मान मिळवून दिला – प्रा.डॉ. लहू वाघमारे



लातूर :- भारतात हजारो वर्षांपासून मनुप्रणित समाज व्यवस्थेत स्त्रियांना चूल आणि मूल एवढ्याच चौकटीत बंदिस्त करण्यात आले होते. सावित्रीबाई फुले यांनी ही बंदिस्तपणाची चौकट पहिल्या प्रथम मोडून काढली. त्यांनीच प्रथम या देशात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यामुळेच आज आपल्या देशात स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. देशाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया आज सर्वोच्च पदावर विराजमान झालेल्या आहेत. याचे सर्व श्रेय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना जाते. आपल्या समग्र स्त्री जातीला विकसित करण्यासाठी सावित्रीबाईंनी स्वतः च्या अंगावर शेण,चिखलाचा मारा झेलून अपार परिश्रमाने ज्ञानाची व विकासाची गंगा सर्व स्तरापर्यंत नेली. त्यांच्या विचारांचा,कार्याचा व शिक्षणाचा अनमोल वारसा पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी आजच्या समाजाने स्वीकारली पाहिजे. तेच खरे सावित्रीबाई फुले यांना अभिवादन ठरेल. असे मत बोधी किड्स प्री प्रायमरी स्कूल सुभेदार रामजी नगर, लातूर येथे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त संपन्न झालेल्या व्याख्यानाच्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रा.डॉ. लहू वाघमारे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून बोधी किड्स प्री. प्रायमरी स्कूलचे अध्यक्ष मा. हणमंत कांबळे आणि आयुनि. ज्योती कांबळे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. त्यांनीही उपस्थिताना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार मुख्याध्यापिका आयुनि.कल्पना पंडित यांनी केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षिका आणि पालक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या हस्ते लातूर पोलीस दलाच्या वतीने आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन.



लातूर :- पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त लातूरच्या क्रीडा संकुलात पोलिस दलाच्या वतीने भव्य प्रदर्शन भरविण्यात आले असून या प्रदर्शनामध्ये जिल्हा पोलिस दलातील वेगवेगळ्या विभागाचे स्टॉल लावण्यात आले असून सदर प्रदर्शनीचे उद्घाटन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या हस्ते पार पडले. सदरचे प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेक शाळांचे विद्यार्थी, विद्यार्थिनी सहलीच्या रूपाने क्रीडा संकुलात प्रदर्शन पाहत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना पोलिस दलाच्या कामकाजाची ओळख होत आहे.

सायबर सेल, भरोसा सेल, मानव तस्करी विरोधी पथक, बॉम्बशोधक पथक, शस्त्र विभाग, क्राईम ब्रँच, इन्वेस्टिगेशन व्हॅन, डॉग स्कॉड, वाहतूक सुरक्षा, वायरलेस यंत्रणा, सुरक्षा हेल्पलाइन अशा विविध विभागाच्या माहितीचे आणि शस्त्राचे प्रदर्शन पोलिस स्थापना दिनाच्या (रेझिंग डे) निमित्ताने भरविण्यात आले आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्यासह जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अजय देवरे यांनी प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी पोलिस अधीक्षक सोमय मुंडे विजया रहाटकर यांना पोलिस दलाच्या वेगवेगळ्या विभागाची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी अन् नागरिकांनी पोलिस दलाचे कामकाज जाणून घ्यावे.

जिल्हा क्रीडा संकुलामध्ये सुरू पोलिस दलाचे प्रदर्शन सुरू असून याला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे. सर्वच विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी प्रदर्शन पाहून पोलिस दलाच्या कामकाजाची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाचे अध्यक्ष विजया रहाटकर यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वाढला....

लातूर शहरातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांना पोलिस दलाचे प्रदर्शन दाखविले जात आहे. दोन दिवस चालणारा प्रदर्शन पाहण्यास मोठा प्रतिसाद मिळत आहे. बहुतांश सर्वच शाळांचे विद्यार्थी प्रदर्शन पाहण्यासाठी गर्दी करत आहेत. जणू विद्यार्थ्यांच्या सहलीचं प्रदर्शन पाहण्यासाठी शाळांकडून आयोजित केल्या जात आहेत,असे चित्र क्रीडा संकुलात पाहायला मिळत आहे. पोलीस प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी लातूर शहर व जिल्ह्यातील विविध शाळेतील जवळपास ८ हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी भेट दिली असून उद्या प्रदर्शनाचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. त्यामुळे सदर प्रदर्शनात जास्तीत जास्त नागरीक व विद्यार्थ्यांनी भेट द्यावी असे आव्हान लातूर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## आनंदराज आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत किल्लारी नगरीत चौथ्या विशाल बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन



किल्लारी :- तक्षशिला बुद्ध विहार तथागत बुद्ध गार्डन ग्रामीण रुग्णालयाच्या पाठीमागे किल्लारी तालुका औसा जिल्हा लातूर या ठिकाणी पूज्य भदंत धम्मसार थेरो यांच्या संयोजनातून रविवार दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत चौथ्या विशाल बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे या धम्म परिषदेला मुख्य अतिथी म्हणून महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नातू सरसेनानी आनंदराज जी आंबेडकर साहेब राष्ट्रीय अध्यक्ष रिपब्लिकन सेना हे उपस्थित राहणार आहेत. या धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थान*पूज्य भदंत डॉक्टर उपगुप्त महाथेरो कार्याध्यक्ष अखिल भारतीय भिकू संघ बुद्धगया बिहार हे असणार आहेत या धम्म परिषदेमध्ये पूज्य भदंत डॉक्टर यशपायन महाथेरो जयसिंगपूर ,पूज्य भदंत धम्मनाग महाथेरो हत्यार, पूज्य भदंत पैयातीसह महाथेरो शिरसाळा, पूज्य भदंत महाविरो थेरो काळेगाव, पूज्य भदंत पैय्यानंद थेरो लातूर, पूज्य भदंत धम्मशील थेरो, बीड, पूज्य भदंत धम्मवीरीवो थेरो मुंबई, पूज्य भदंत नागसेन बोधी उदगीर व वीस ते पंचवीस भिकू संघ उपस्थित राहून धम्मदेशना देणार आहेत. या धम्म परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून औसा विधानसभेचे आमदार अभिमान्यू पवार साहेब, रिपब्लिकन सेनेचे प्रदेश अध्यक्ष काकासाहेब खंबाळकर, बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे, साहेब रिपब्लिकन सेनेचे प्रदेश सचिव प्राध्यापक युवराज धसवडीकर, रिपब्लिकन सेनेचे प्रवक्ते समाजभूषण वसंतराव कांबळे मुंबई, सेवानिवृत्त विक्रीकर उपायुक्त मुंबई आयुष्यमान रमेश चक्रे रेणापूरकर, व विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या धम्म परिषदेच्या स्वागत अध्यक्ष पदी किल्लारी ग्रामपंचायतचे उपसरपंच आयुष्यमान युवराज गायकवाड हे असणार आहेत या धम्म परिषदेत उपस्थित राहणाऱ्या उपासक आणि उपाशी का यांच्या भोजनाची व्यवस्था किल्लारी नगरातील शौकत भाई शेख यांच्या वतीने करण्यात आलेली आहे या धम्म परिषदेत सुमित गायकवाड प्रस्तुत बुद्ध भीम गीतांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम गायिका आयु. सुनिता ताई गायकवाड व आयु.प्रज्ञाताई गायकवाड लातूर या करणार आहेत. तरी या धम्म परिषदेत किल्लारी परिसरातील श्रद्धा संपन्न बौद्ध उपासक आणि उपाशी का यांनी शुभ्र वस्त्र परिधान करून जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन या धम्म परिषदेचे मुख्य संयोजक पूज्य भदंत धम्मसार थेरो यांनी केले आहे.



लातूर जिल्हा युवा सेनेच्या वतीने व्हॉइस ऑफ मीडिया डिजिटल विंगचे जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल डॉ. सितम सोनवणे यांचा सत्कार युवासेनेचे जिल्हा अध्यक्ष ड.राहुल मातोळकर, खंडू जगताप,संतोष माने, दत्ता पाटील,ब्रह्मा तिघीले,अक्षय चवळे,अमित हांडे पाटील,अजय गंभिरे यांच्या हस्ते करण्यात आला.

## संपादकीय....

# विकासाचे नवे पर्व

विख्यात कवयित्री शांताबाई शेळके यांची ही कविता! संपलेले वर्ष अनेक खळबळजनक घटनांनी भरलेले होते. जगात ठिकठिकाणी युद्धे सुरूच होती आणि निवडणुकाही. भारतात लोकसभा आणि महाराष्ट्रासह अन्य राज्यांत विधानसभा निवडणुका पार पडल्या. जम्मू–काश्मीरमध्ये शांततापूर्ण निवडणुका होऊन तेथे सरकार अस्तित्वात आले, ही लोकशाहीच्या दृष्टीने फार मोठी गोष्ट होती. २०२४ मधील सर्वात आनंददायी घटना म्हणजे, अयोध्येतील राम मंदिराचे उद्घाटन झाले आणि त्याचवेळी 'इस्रो'ने नवीन उपग्रह लाँच करून कामगिरीत आणखी एक तुरा खोवला. गगनयान मोहिमेसाठी यशस्वीपणे प्रायोगिक प्रक्षेपण करण्यात आले. तामिळनाडूमध्ये देशातील पहिला हायड्रोजन ऊर्जा प्रकल्प सुरूही झाला. नागरिकांच्या वैयक्तिक डेटाचे संरक्षण करण्यासाठी नवा कायदा अमलात आला. कोलकाता येथे भारतातील पहिल्या अंडरवॉटर मेट्रोलाईनचे उद्घाटन झाले. ताडोबा महोत्सवात महाराष्ट्र वन विभागाने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड केला. मराठीसोबतच पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांना अभिजात दर्जा देण्यात आला. ओडिशाच्या किनार्याजवळ 'रुद्र एम २' या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी करण्यात आली. 'इस्रो'ने मंगळ मोहिमेचा तिसरा टप्पा पूर्ण केला.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने १० पदके जिंकून ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. डी. गुकेश हा बुद्धिबळाचा विश्वविजेता झाला. जगामध्ये भारताची मान उंचावणार्या अशा अनेक घटना घडल्या आणि अर्थात म्हणूनच २०२५ बद्दलच्या अपेक्षा आणखीच उंचावलेल्या आहेत. गेल्या वर्षात सेन्सेक्स आणि निफ्टीने गुंतवणूकदारांना सरासरी ८ टक्के इतका परतावा मिळवून दिला. परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून विक्रीने जोर पकडला असला, तरी निर्देशांकांसाठी हे सलग नववे सकारात्मक परताव्याचे वर्ष ठरले. भूराजकीय ताणतणाव आणि जागतिक आर्थिक अनिश्चिततेमुळे सोने ही वर्षातील सर्वोत्तम, म्हणजे २३ टक्के लाभ देणारी मालमत्ता ठरली. यंदाच्या वर्षात जागतिक संघर्ष निवळण्याची शक्यता असून, त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वाढेल आणि एकूणच गुंतवणूकदारांसाठी हे वर्ष खूपच लाभदायक ठरण्याची शक्यता आहे. आता रियल टाईम ग्रॉस सेटलमेंट (आरटीजीएस) आणि नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंडस् ट्रान्स्फर (एनईएफटी) सेवा देताना बँकांनी लाभार्थ्यांच्या बँक खात्याची पडताळणी करण्याची सुविधा ग्राहकांना १ एप्रिल २०२५ पासून द्यावी, असे निर्देश रिझर्व्ह बँकेने दिले आहेत. डिजिटल निधी हस्तांतरणाची सुरक्षा आणि विश्वासार्हता वाढवण्यासाठी हे पाऊल उचलले असून, हा महत्त्वाचाच निर्णय आहे. अर्थात १ जानेवारी २०२५ पासून यूपीआय आणि आयएमपीएस या देयक प्रणालींमध्ये ग्राहक पैसे वर्ग करण्याआधी लाभार्थ्याच्या नावाची पडताळणी करू शकतात. हे लाभदायक ठरत असल्याचा अनुभव आहे.

१ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर होणार असून, यावेळी वैयक्तिक प्राप्तिकरात नक्कीच वाढीव सवलत दिली जाईल, असा अंदाज आहे. तसे घडल्यास महागाईच्या कारणाने त्रस्त झालेल्या मध्यमवर्गीयांना दिलासा मिळणार आहे; मात्र भारताची मोठी लोकसंख्या ही अद्यापही शेतीवर अवलंबून आहे. किमान हमीभाव किंवा एमएसपीसाठी देशातील शेतकरी पुन्हा रस्त्यावर उतरलेला आहे. कांदा, सोयाबीन, कापूस यांचे पीक घेणारा शेतकरी अलीकडील काळात वारंवार अडचणीत आलेला आहे. केवळ महाराष्ट्राचाच विचार केला, तर गेल्या वर्षीच्या पहिल्या १० महिन्यांतच अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाना आणि वाशीम या केवळ पाच जिल्ह्यांतच २०६ शेतकर्यांनी आत्महत्या केल्या. रास्त भाव मिळत नाहीत, अवकाळी पाऊस, दुष्काळ अशा संकटांमुळे शेतकरी त्रस्त झालेला आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाने शेतकर्यांना साह्यभूत ठरणारे दोन प्रमुख निर्णय घेतले असून, ते स्वागतार्ह आहेत. पंतप्रधान पीक विमा योजना आणि हवामानआधारित पीक विमा योजना अधिक सक्षम करण्यात आली असून, या योजनेवरील आर्थिक तरतूद ६९,५१५ कोटी रुपये करण्यात आली आहे. नुकसानीचे दावे विचारात घेऊन भरपाई जलद गतीने देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. सध्या उत्पन्नाच्या अंदाज प्रणालीसाठी 'यस टेक' या तंत्रज्ञानाचा वापर महाराष्ट्रासह नऊ राज्यांमध्ये केला जातो. आता अन्य राज्यांतही त्याचा वापर केला जाणार आहे.

यामुळे पीक विम्याबाबत बळीराजाचे काही प्रमाणात तरी समाधान व्हावे. तसेच पोषक तत्त्व आधारित अनुदान योजनेशिवाय डायअमोनियम फॉस्फेट म्हणजेच डीएपी खतांवरील अनुदानही कायम ठेवण्यात आले आहे. त्यामुळे शेतकर्यांना ५० किलो खताची गोणी १,३५० रुपयांना उपलब्ध होईल. नव्या वर्षात केंद्र सरकार सायबर आणि अवकाश क्षेत्रातील तंत्रज्ञान, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग आणि रोबोटिक्स या क्षेत्रांवर अधिक भर देणार आहे. जगासोबत राहायचे असेल, तर नवनव्या व बदलत्या तंत्रज्ञानाकडे पाठ फिरवून चालणारच नाही. तसेच संरक्षण क्षेत्रात 'थिएटर कमांड'ची निर्मित करण्यात येणार आहे. या नव्या रचनेनुसार लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या क्षमतांचा एकत्रित वापर केला जाणार आहे. एखादी युद्धमोहीम हाती घ्यायची असेल, तर तिन्ही दलांची संसाधने एकत्रितपणे वापरता येतील. भौगोलिक क्षेत्रानुसार 'थिएटर कमांड'ची निर्मिती केली जाणार आहे. चीन वा पाकिस्तानच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी ही नवी व्यूहरचना फायद्याची ठरू शकेल. यावर्षी देशातील जनगणनेचे काम सुरू होणार आहे. प्रथमच संपूर्णपणे डिजिटल जनगणना होणार असून, नवी धोरणे ठरवण्यासाठी याचा उपयोग होणार आहे.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त.....उत्तम समाजसेविका

स्त्री– मुक्तीच्या लढ्याची सुरुवात करणा–या सावित्रीबाई फुले तसेच दारिद्र्य, अज्ञान व भोळ्या धर्मसमजुतीचा अंधार नाहीसा करण्यासाठी आद्य समाज–क्रांतिकारक ज्योतिबा फुल्यांनी ज्ञानाचा दिवा लावला. त्यांतील ज्योत बनले ज्योतिबा आणि तेल झाली सावित्रीबाई ! पहिल्या शाळेच्या रुपाने याच ज्ञानरुपी दिव्याने प्रकाशाचा पहिला किरण स्त्री – शुद्रांच्या जीवनात पाडला.

सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यात नायगांव हे गांव, खंडोजी नेवासे हे इनामदार पाटील, कष्टाळू आणि गरिबांचे कनवाळू, तसं तर खंडोजी पाटलांचे सगळे घरच हुशार व सुसंस्कारीत होते. तशी त्यांची मोठी ख्यातीही होती. स्त्री–मुक्तीच्या आद्यप्रणेत्या सावित्रीबाई फुले यांचा जन्म ०३ जानेवारी १८३१ रोजी लोकप्रिय खंडोजी पाटील यांच्या पोटी झाला. हा एक योगच म्हणावा लागतो. या सुंदर व सशक्त रुपाने सारा गावच आनंदून गेला.

खंडोजी पाटलांचे घर म्हणजे हुशारी व सुसंस्कारांची जणू पाठशाळाच होती. सावित्रीने हे सगळे गुण तिच्या लहान वयांतच उचलून घेतलेले होते. एकुलती एक लेक पाच वर्षांची झाली असतांनाच सावित्रीच्या आईला तिच्या लग्नाची धास्ती वाटू लागली. कारण लहान वयांतच मुलीचे लग्न लावून देणे त्याकाळी ही प्रथाच रुढ होती. सहा वर्षाची मुलगीही त्याकाळी घोडनवरी समजली जायची. ही प्रथा जरी अनिष्ट होती तरी तत्कालीन सामाजिक परिस्थितीने ती सर्वांच्याच माथी मारलेली होती. लहान वयांत लग्न लावून देणे म्हणजे मुलीचे आयुष्य बरबाद करण्याचाच प्रकार होता तो ! असे असतांना आपल्या गुणी व सुखरुप मुलीला अनुरुप वर मिळाल्याशिवाय तिचे लग्न करायचे नाही. शिवाय तिच्यासाठी अनेक मागण्या येऊनही लग्नासाठी नकार दिला. प्रस्थापित रुढीला बगल देऊन ती मोडीत काढण्याचा एक प्रकारे हेका केला. त्याचबरोबर इच्छित व अनुरुप वर शोधतांना मुलीच्या वाढत्या वयांबद्दल त्यांना लोकांची बोलणीही खावी लागली. तरीही तत्कालीन सामाजिक अनिष्ट प्रथेला खंडोजी पाटलांनी केलेला तो एक प्रकारे विरोधच होता.

ज्योतिबा या आपल्या हुषार व तेजस्वी मुलासाठी गोविंदराव आणि आईसारखा सांभाळ करणाऱ्या सगुणाबाई अनुरुप अशीच मुलगी शोधत होते. सगुणाबाईच्या दूरच्या नात्यातली सावित्री त्यांना चांगली माहित होती. तिला पाहण्यासाठी वराकडील मंडळी नायगांवी आली. आपल्याही लेकीला अगदी साजेसा व अनुरुप वर सापडल्याबरोबर खंडोजी पाटलांनी आणि साऱ्या गावाने अगदी मोठ्या थाटामाटात सावित्री ज्योतिबांचा विवाह सोहळा पार पाडला. सन १८४० मध्ये ज्योतिराव तेरा वर्षाचे आणि सावित्रीमाई नऊ वर्षाची असतांना हा विवाह सोहळा पार पाडला.

ज्योतिबा आणि सावित्रीबाई या जोडप्यांच्या हातून पुढच्या काळात स्त्रियांच्या शिक्षणाचे आणि सामाजिक जागृतीचे इतरही महान कार्य झाले. खरंच म्हणजे त्या मागची मुख्य शक्ती म्हणजे सगुणाबाई क्षीरसागर होती. सगुणाबाई या नात्याने ज्योतिबांच्या मावसबहीण परंतु नऊ महिन्याचे असतानाच पोरके झालेल्या ज्योतिबांना सगुणाबाईंनी आईची माया दिली. जिजाबाईच्या डोळसमायेने त्यांनी ज्योतिबांचा सांभाळ केला. शिक्षणाची आवड असणाऱ्या गोविंदरावांनी तल्लख बुध्दीच्या ज्योतिबांना 'चर्च ऑफ स्कॉटलंड' मिशनच्या शाळेत घातले. पण बहुजन समाजातल्या मुलाने शिक्षण घ्यावे हा विचारच सनातन्यांना पटला नाही. याबद्दल सनातन्यांना वैषम्य वाटल्यानेगोविंदरावांना त्यांनी वाळीत टाकले. बहुजनातले असतांना मुलाला शाळा शिकवण्याचे धर्मबाह्य वर्तन गोविंदरावांच्या हातून घडल्यामुळे हे मोठे पातक आहे असे मानून ज्योतिबांना शाळेतूनच काढायला भाग पाडले. ज्योतिबा फारच हुशार आहे. परंतु त्याला शाळेतून काढल्याचे सगुणाबाईंना खूप दुःख झाले खेदही वाटला. आपल्या ज्योतिबाने खूप शाळा शिकावी आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांप्रमाणे समाजाची सेवा करावी ही त्यांची मनोभावना होती. मोठ्या प्रयत्नांनी बुधवार वाड्यातल्या एका चांगल्या शाळेत घालून शाळा शिकविली. याचाच फायदा म्हणून सामाजिक कार्याचा विचार सगुणाबाईंनी तल्लख बुध्दीच्या ज्योतिबांच्या मनांत पेरला.

सावित्रीबाई : व्यक्तित्व


भारतातील पहिल्या शिक्षिका–स्त्रीमुक्ती चळवळीच्या पहिल्या नेत्या, पददलितांच्या कैवारी आणि प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या म्हणून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्थान अढळ राहिलेले आहे. एका अशिक्षित स्त्रीने शिक्षण घेऊन शिक्षिका बनावे, वर्षानुवर्षे अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणाऱ्या स्त्री–शुद्रांना ज्ञानाचा प्रकाश दाखवावा ही गोष्टच भारताच्या दोन हजार वर्षांच्या इतिहासात अपूर्व अशीच आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रातून सामाजिक क्षेत्रात पदार्पण करावे, दुष्काळात अन्नान करुन तडफडणाऱ्या हजारो जिवांच्या मुखांत घास भरवावा, शेतकरी सामाजिक सुधारणांसाठी वाङ्मयाचे साधन हाती घेऊन कवयित्री व लेखिका बनावे, सर्व गाव, सर्व समाज सुशिक्षित व सुसंस्कृत करण्याचे तसेच जनावरांप्रमाणे जिणे जगणाऱ्या स्त्री–शुद्रांना माणसात आणण्याचे वेड घ्यावे, पतीच्या निधनानंतरही शोकाला न कवटाळता सत्यशोधक समाजाच्या तत्वप्रसाराचे कार्य करण्यासाठी सतीचं वाण घेऊन अविश्रांत कार्य करीत राहवे. दीन दलितांच्यासाठी व दीनदलितांच्या मुलांसाठी अनेक रोगांच्या साथीत मदत देण्यासाठी धावून जावे. त्यांची सेवा–सुश्रुषा करावी, प्लेगसारख्या जीव घेण्या साथीच्या रोगात पीडितांना सेवा देतांना आपणही अनंतात विलीन होऊन जावे. अशा प्रामाणिक त्याग भावनेने पेटून उठलेल्या समाजसेविकेस अलौकिक हेच नामबिरुद्र शोभून दिसते.

मनुष्यत्वासाठी शिक्षण

सावित्रीबाई कार्यकर्तृत्वाच्या पटावरुन सहजही ओझारती नजर टाकली असता या स्त्रीचे व्यक्तित्व किती असामान्य होते हे चटकन लक्षात येते. एका समाजसुधारकाची पत्नी म्हणून त्यांचे एक सवंग अस्तित्व होते असे मुळीच म्हणता येणार नाही. खरं पाहिले, तर सावित्रीबाईंनी ज्योतिरावांना त्यांच्या इहलोकातील आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत साथ दिली, परंतु ही साथ केवळ एका पति परायण स्त्रीची नव्हती, तर त्यांची प्रेरणा स्वतंत्र अशीच होती.

सावित्रीबाईचा जन्म एका गरीब व शेतकरी कुटुंबात झालेला होता. शिरवळजवळच्या एका छोट्याशा खेड्यात जेथे सबंध गावातच मोजून शंभर दीडशे उंबरा सापडणेही कठीण! त्या गावाला नेहमीच दुष्काळाची परंपरा लाभलेली असे. शिक्षणाचे कसलेही संस्कार नसलेल्या निरक्षर कुटुंबात जन्मलेली व वाढलेली ही स्त्री ज्योतिरावांच्या हाताखाली शिक्षणाचे धडे गिरविते, शिक्षकाचे प्रशिक्षण घेते आणि ज्ञानदानाचे व्रत घेऊन



ज्ञानयोगिनी बनते, मोठी हिंमतच म्हणायची तिची ! फुले दांपत्याने शाळा काढल्या, परंतु ते केवळ शाळेची जाळीच विणीत बसले नाहीत. केवळ साक्षर करण्यासाठीच त्यांना शिक्षण घायचे नव्हते, तर शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन किंबहुना शिक्षणातून त्यांना समाजजागृती करायची होती. शिवाय तत्कालीन समाजात जुनाट रुढी–परंपरा, अंधश्रध्दा आणि भोळ्या समजुती हद्दपारकरायच्या होत्या. समाजात सामान्य लोक पशुतुल्य जीवन जगत होते. त्यांच्यात मनुष्यत्व कसे आणता येईल याचा सावित्रीबाईंनी संकल्पपूर्वक विचार केला. यासाठी 'काव्यफुले' या काव्यसंग्रहात त्या म्हणतात –

शुद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा। शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हटते पहा ।।

दृष्टे माणसं काळाच्या पुढे असतात, याप्रमाणे मनुष्यत्वासाठी शिक्षण हा विचार मूलभूत मानून सव्वांशे वर्षापुर्वी सावित्रीबाईंनी भारतीय समाजात रुजविला. म्हणून तर सावित्रीबाई फुले भारतातील थोर शिक्षणतज्ज्ञ म्हणून ओळखल्या जातात. स्त्री–शुद्रांना माणूस बनविणे, ताठ मानेने उभं राहायला त्यांना शिकविणे आणि त्याहीपलीकडे जाऊन स्वत्व जपणे व माणसांबद्दल प्रेम निर्माण करण्यास शिकविले. हा एवढा शिक्षणविषयक व्यापक दृष्टीकोण ह्या लोकोत्तर स्त्रीच्या ठिकाणी होता.

शैक्षणिक कार्याची सुरुवात

ज्योतिबा आणि सावित्रीबाईच्या हातून स्त्री शिक्षणाचे आणि इतरही सामाजिक जागृतीचे जे महान कार्य झाले. त्या मागची मुख्यशक्ती होती सगुणाबाई क्षीरसागर या दोघांना घडविण्यामध्ये सुगणाबाईंचा फार मोठा हातभार होता. आईविना पोरक्या ज्योतिबांचा सांभाळ तिने जिजाबाईच्या डोळस मायेने केला. शिक्षणाची आवड असणाऱ्या गोविंदरावांनी तल्लख बुध्दीच्या ज्योतिबांना 'चर्च ऑफ स्कॉटलँड' मिशनच्या शाळेत घातले.

सगुणाबाईबरोबर ट्रेनिंगचा कोर्स पूर्ण केल्यानंतर ज्योतिबांनी मुलींसाठी काढलेल्या भिडे वाड्यातल्या शाळेत सावित्रीबाई विनावेतन शिक्षिकेचे काम करु लागल्या, पण त्याकाळी शिक्षिकेचे काम करणे महिलांसाठी सोपी गोष्ट नव्हती त्यांतल्या त्यांत सावित्रीबाईसाठी तर फारच अवघड होते. कारण त्यांचा नवरा मुलींना शिक्षण देण्याचे एक 'पातक' करीत होता. त्याचबरोबर मुलींच्या शाळेत शिकवायला जाण्याचे दुसरे 'पातक' सावित्रीबाईच्याही हातून घडू लागले. ही समज तत्कालीन समाज व्यवस्थेची झाल्यामुळे त्यांच्या छळाला पारावारच राहिला नाही. त्या शाळेत जाऊ लागल्या की, ब्राह्मणांनी त्यांना खडे मारावे, अचकट विचकट शिव्या त्यांना द्याव्या, प्रसंगी शेणाची व चिखलाची गोळेही त्यांच्या अंगावर फेकावे इतक्यावरच न थांबता त्यांच्या चारित्र्यावरही संशय घ्यावा, परंतु एवढा छळ सोसूनही अगदी शांतवृत्तीने सावित्रीबाईंनी शिक्षणाचे कार्य अविरतपणे चालूच ठेवले.

सावित्रीबाईच्या अंगावर एकदांतर फार मोठा प्रसंग बेतला तो असा की, एक आडदांड इसम शाळेत जात असतांना सावित्रीबाईच्या समोर वाट आडवून उभा राहिला आणि म्हणाला, 'तू शाळा बंद करतेस का तुझी अब्रू घेऊ !' अशी धमकी देऊ लागला. तो प्रसंग फार बाका होता. कारण तो तिच्या अस्तित्वाचाच खरांतर प्रसंग होता, पण त्यांचे अविरत कार्य आणि ज्योतिबांवरची प्रचंड निष्ठा यामुळे त्यांचे आत्मबल वाढले. त्यांना मोठे धैर्य मिळाले. त्यामुळे सावित्रीबाईंनी खाडकन दोन थपडा त्याच्या कानशिलात लगावल्या. सावित्रीबाईकडून प्रतिकार होईल ही अपेक्षाच नसलेल्या त्या धटिंगणाचे अवसानच गळाले. शेवटी तोंड लपवून तो बेपत्ता झाला. तेंव्हापासून सावित्रीबाईच्या वाटेस कुणी गेले नाही. एवढेच नाही, तर शाळेत येणाऱ्या मुलींनाही असा त्रास होत असे, पण पालकांना वारंवार भेटून त्याचाही बंदोबस्त त्यांनी केला.

सावित्रीबाईंनी केवळ शाळा काढून स्त्रियांना शिक्षण देण्याचेच कार्य केले नाही, तर शिक्षण शास्त्रातले अनेक मूलगामी विचार आपल्या अनुभवांवरुन मांडले.बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना सावित्रीबाई फुले या केवळ बोलघेवड्या सुधारक नव्हत्या, तर आपल्याला पटलेला सामाजिक विचार त्यांनी अंमलात आणला. त्या कर्त्या सुधारक होत्या. काळाची गरज ओळखून योग्यतीच पाऊले त्यांनी उचलली. त्याच बरोबर नुसत्या शिक्षणाच्या शाळा सुरु केल्याने व स्त्रियांना शिक्षण देण्यांतच सावित्रीबाई आणि ज्योतिबांना फारसे समाधान वाटले नाही, तर समाजातल्या बालविधवांचे जिणि व कुमारी मातांची स्थिती त्यांना अस्वस्थ करीत होती.

वाट चुकलेल्या बालविधवांची जी दयणीय स्थिती होती त्यांवर सातत्याने सृजनशीलतेने विचार करुन सावित्रीबाई आणि ज्योतिबांनी २८ जानेवारी १८५३ रोजी 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना केली. कोणा एकाद्या विधवेचे अज्ञानपणाचे जर चुकून पाऊल पडले, तर तिला धीर देऊन तिची समजूत ते काढीत असत. तिला आधारही देत असते. याबाबतीत जे सामाजिक परिवर्तन घडून येणे आवश्यक होते त्यासाठी जे काय करता येईल हे संपूर्ण विचारांतीच त्यांनी केलेले होते. हे असे सामाजिक परिवर्तनाचे कार्य सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांच्यासारखे खंबीर व क्रांतिकारक सुधारकच करु शकतात !

खरे पाहिले, तर सावित्रीबाईच्या अलौकिक कार्याबद्दल कृतज्ञता दाखविणे हे प्रत्येक भारतीय स्त्रीचे कसे कर्तव्य आहे हे सांगतांना एके ठिकाणी कीर म्हणतात, हिंदी स्त्रियांनी सावित्रीबाई फुले यांचे कार्य तर सोडाच, परंतु यांच्या पुण्यस्मृतीलाही जागत नाहीत. ज्या साध्वीने भारतातील तमोयुगात शिक्षिकेचा पेशा पत्करण्याचे अलौकिक धैर्य दाखवून हिंदी स्त्रीवर लादलेली बंधने अन्यायी आहेत जी सुगारुन दिली आणि मुलींना शिकवून हिंदी स्त्रियांचा उध्दार करण्यासाठी पतीबरोबर सासऱ्याचे घर सोडले, हालअपेष्टा सोसल्या. शिव्या शाप सहन केले. तरीही त्या स्त्री शिक्षणाच्या अग्रतीची हिंदी स्त्रियांनी स्मृती बाळगू नये ही कृतघ्नपणाची परमावधीच नव्हे काय? एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या उध्दारासाठी व्यतीत केलेले सावित्रीबाईसारखे अन्य आदर्श व उदात्त उदाहरण क्वचितच आहे !

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त कोटी–कोटी प्रणाम !

--------------------------


**मोहन कांबळे सेलूकर**

**'लुम्बिनी' प्रकाश नगर, लातूर**

**मो.नं. ९७३०७८८५७८**

# करारी बाणा जपणारी सावित्रीबाई !!

ज्या काळात स्त्रीला समाजात मानाचे स्थान मिळत नव्हते, शिक्षणापासुन आणि स्वातंत्र्यापासुन दूर ठेवून स्त्रीला परावलंबी आणि परतंत्र दुर्लक्षित केले जात होते, त्या काळात सावित्रीबाईचा जन्म झाला. पुढे मात्र क्रांतिज्योती सावित्रीबाईना जोतिबा फुले यांचा उदार दृष्टीकोण त्यांच्या ठायी असल्याने स्वतःचे व्यक्तिमत्व घडविण्याची संधी त्यांना प्राप्त झाली, हे त्यांचे अहोभाग्य म्हणावे लागेल. ज्योतिबा सारखे व्यक्तिमत्व त्यांच्या जीवनी आलं आणि आयुष्यच पार बदलून गेले.



सावित्रीबाईना बालपणी घरच्यांकडून शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळणे त्या काळात शक्यच नव्हते, कारण त्यासाठी मनुवाद्यांचे वर्चस्व होणे, स्त्रीला शिक्षणापासुन मज्जाव होता. सावित्रीबाईना मात्र बालवयापासून शिकावे असे मनोमन वाटत होते. ते त्यांनी विवाह झाल्यानंतर साध्य केले, ही त्यांच्या जमेची बाजू झाली. सावित्रीबाई आणि ज्योतिबा यांना अपत्य नव्हते. त्यांनी यशवंतरावांच्या मुलाला आणि त्यांच्या विधवा आईला आपल्या घरी आश्रय दिला. पुढे सावित्रीबाईनी ज्योतिबांशी विचार विनिमय करुन यशवंताला दत्तक घेतले. यशवंताच्या खऱ्या आईला सावित्रीबाईनी अत्यंत प्रेमाने वागविले, ही त्यांच्या मनाच्या मोठेपणाची साक्ष होती. ज्या जोतिबांच्या मनाने स्त्रीयांनी शिकावे असा विचार केलेला असल्यामुळे त्यांनी आपल्या पत्नीपासूनच स्त्री शिक्षणाला आरंभ केला होता. जोतिबांच्या वडिलांनी आपल्या मुलाच्या शिक्षणाबाबत विरोध प्रकट केला होता. तिथे सुनेच्या शिक्षणाला ते नकार देतील यात काय आश्चर्य, पण ज्योतिबांचा मुलीसाठी शाळा काढण्याचा विचार निश्चित झाला होता. त्यामुळे त्याचा आरंभ त्यांनी आपल्या पत्नीपासून म्हणजे सावित्रीबाईपासुनच केला. शेतात काम करतानाच झाडाखाली बसून काळया मातीत अक्षरे गिरवत सावित्रीबाई शिकू लागल्या. यामध्ये थोडी प्रगती झाल्यावर त्यांनी एका सरकारी शाळेत प्रवेश घेऊन पुढचे शिक्षण चालू ठेवले. त्यामुळे स्त्री शिक्षणाला चालना देण्याचे धैर्य त्यांनी दाखविले. त्या दरम्यान स्त्रीला शिक्षणापासुन वंचित ठेवता कामा नये.

असा निर्धार करुन १४ जानेवारी १८४८ साली ज्योतिबांनी पुण्यातील बुधवारपेठेत भिडयांच्या वाडयात मुलींची पहिली शाळा काढली. त्यात सावित्रीबाई पहिल्या शिक्षिका म्हणुन कार्यरत होत्या. सनातनी पुण्यात हलकल्लोळ माजवित होते. 'कलीयुग आले, धर्म बुडाला, कली मातला', अशी सनातन्यांनी बोंब करावयास सुरवात केली. त्याला न जुमानता बेडरपणे या सर्व गोष्टींना त्यांना काडीचीही किंमत दिली नाही. कारण त्यांना हे माहित होते की, चांगल्या कामाची उपेक्षा, अवहेलना होते नंतर त्याबद्दल कुतुहल निर्माण होते, व शेवटी त्याचा स्विकार होतो, तसे या कार्याचे झाले. पण मुलींना शिकवायचे धाडस करायला कुणी शिक्षक पुढे येईना. तेव्हा सावित्रीबाई शाळेत जाऊन मुलींना शिकवू लागल्या. सोबत त्यांची सहकारी फातिमा शेख यांनी सुध्दा त्यांच्या समवेत बरेच सहकार्य करुन त्यांच्या पाठीशी खंबीर उभ्या राहिल्या, तेही निरधास्तपणे. बायकांनी शिकणे हे महापाप आणि त्यांना शिकवणे हे तर महाभयंकर पाप असे त्याकाळी सर्वच समाज समजत असल्याने कसलीही तमा न बाळगता धाडसाने सावित्रीबाई शाळेत मुलींना शिकवायला जाऊ लागल्या.

पुण्यातील अतिकर्मठ ब्राम्हण लोक त्यांच्यावर दगड, शेण, चिखल वगैरे फेकीत पण सावित्रीबाईनी या सर्व छळाला शांतपणे तोंड देऊन मुलींना शिक्षण देण्याचे कार्य अव्याहत चालू ठेवले. सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांनी नंतर दोन–तीन शाळा काढल्या अशावेळी शिक्षकांची गरज भासू लागली स्त्री शिक्षिका मिळणे कठिणच होते. अशावेळी उस्मान शेख यांच्या भगिनी फातीमा शेख यांनी सावित्रीबाई समवेत शिक्षिका म्हणुन उत्तम कार्य केले. उस्मान शेख हे ज्योतिबांचे जीवलग मित्र होते. हे येथे आवर्जून सांगावेसे वाटते. पुणे येथील हे शैक्षणिक कार्य पाहून १८५२ मध्ये इंग्रज सरकारने फुले पती–पत्नीचा मेजर कॅन्डी यांच्या हस्ते जाहीर सत्कार केला आणि शाळांना सरकारी अनुदानही जाहीर केले. भारतातल्या मुलींच्या पहिल्या शाळेतील या पहिल्या शिक्षिकेने आपले शिक्षण देण्याचे व्रत चालूच ठेवले. त्यांची ही सेवाभावी कृती प्रत्येक स्त्रीने आत्मसात करुन त्याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे आणि ते पूर्णत्वास नेणे प्रत्येक स्त्रीचे कर्तव्य आहे.

पण हे सर्व त्या पतीच्या पावलावर पाऊल टाकून अंधपणे करीत नव्हत्या. तर त्या कार्यावर त्यांची अगाध निष्ठा होती. म्हणून पती निधनानंतरही त्यांनी सत्यशोधक समाजाचे समता आंदोलन पुढे चालू ठेवले. सावित्रीबाईंनी तेव्हा त्यांच्या ठायी असणाऱ्या कविमनाला रुचलेल्या कविता आणि अभंग शब्दबध्दही केले. १८५४ साली त्यांचा हा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला, त्यात त्यांनी आपल्या कवितांमधुन स्त्री, शुद्र, अतिशुद्रासाठी शिक्षणासाठी मोल, महत्व तत्ववेत्याला शोभेल अशा शब्दामधुन साध्या आणि सोप्या पध्दतीने सांगीतले आहे. 'शुद्राचे दुखणे' या काव्यातून मनुष्यत्वासाठी शिक्षणाचे महत्व दिले आहे. ते अधोरेखित करण्याची गरज आहे.

दोन हजार वर्षाचे शुद्राचे दुखणे लागले  
ब्राम्हविहित सेवेचे–भूदेवांनी पछाडले  
अवस्था पाहुनी त्यांची हाच शब्द मनी उठे  
सुलभ मार्ग कोणता काय विचारे बुध्दीही आटे  
खाली शुद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षण मार्ग हा  
शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हाटते पहा

समाजातल्या दीन–दलितांना मायेने जवळ करणाऱ्या स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणुन धडपडणाऱ्या सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहचारिणी म्हणुन शोभल्या. त्यांनी आपल्या पतीच्या महान कार्याचा गौरव काव्यबध्द केला. त्यात कृतज्ञभाव आणि पती ज्योतिबा बद्दल आदर व्यक्त करण्यात आला. काव्य लेखना प्रमाणेच त्यांनी गृहीणी या मासीकात लेखही लिहीलेत त्यांच्या लिखानांना अनुभवाचा भक्कम आधार असल्याने ते लेखनही परिणाम कारक ठरले.

सावित्रीबाईनी जोतिबांच्या सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतला होता. दोघांनी शिकावे समाजातील अस्पृश्यास्पृश्यता नष्ट व्हावी, अनाथांना आश्रय मिळावा ही त्यांची कार्यक्षेत्रे त्यांच्या श्रध्देने प्रभावी झाली. सामाजिक कार्यात पुढाकार घेणे, हे त्यांचे ध्येय होते. त्यामुळेच १८७६–७७ मधल्या दुष्काळात प्लेगची भयंकर साथ आली असतांना त्यांनी आपल्या स्वतःच्या प्रकृतीचीही पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यासाठी काम केले. दुर्दैवाने त्या स्वतःच प्लेगच्या भीषण रोगाने पछाडल्या आणि अशातच त्यांचे निंधन झाले.


महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी त्यांनी काम केले. फुले यांनी विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता. त्या एक लेखिका देखील होत्या, त्यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले आहे. १० मार्च १९९८ रोजी भारत सरकारने सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले. २०१५ मध्ये पुणे विद्यापीठाचे नामकरण 'सावित्रीबाई फुले पूणे विद्यापीठ' असे करण्यात आले.

त्यांच्या थोर सामाजिक कार्याविषयीची कृतज्ञता म्हणून राज्य शासनाने ३ जानेवारी १९९५ पासून सावित्रीबाईचा जन्मदिन हा संपूर्ण महाराष्ट्रात 'बालिका दिन' व 'महिला मुक्तीदिन' म्हणून साजरा केला जातो. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांची क्रांतीज्योत सतत तेवत ठेवणे हे आपले आद्यः कर्तव्य आहे. त्यांच्या १९३ व्या वाढदिवसानिमीत्त विनम्र अभिवादन !

--------

प्रविण बागडे  
नागपूर  
भ्रमणध्वनी : ०९९२३६२०९१९  
ई–मेल : pravinbagdegmail.com

# स्त्री शिक्षणाची प्रकाशवाट – ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले



ज्ञानज्योती सावित्रीबाई नुसतं एक नाव नाही तर स्त्री मुक्ती चळवळी साठी जीवाचे रान करणारी हाती शिक्षणाची मशाल घेऊन कितीतरी मुलींचे जीवन त्या प्रकाशात उजळून काढणारी धगधगती मशाल होती. सावित्रीबाईचे जीवन जणू रखरखत्या विस्तवावरून अनवाणी चालण्यासारखे होते कारण तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता स्त्रियांना शिक्षणाचे तर अधिकार नव्हतेच त्याचबरोबर इतर सामाजिक बंधनेही खूप होती. केवळ अज्ञानातून या सर्व गोष्टींचा सामना स्त्रियांना करावा लागायचा. या सामाजिक बंधनाच्या श्रृंखला हजारो वर्षापासून स्त्रियांच्या पायात अडकून पडलेल्या होत्या. त्यांना साधे चालणेच काय तर स्वैराचाराने उठणे– बसणे सुद्धा अति कठीण. बदलत्या काळाबरोबर चालणे अन धावणे तर दूरच.....! या माऊलीने स्री मुक्तीसाठी त्यांच्या पायात अडकून पडलेल्या रुढीपरंपरा,चालीरीती व बंधनाच्या श्रृंखला,की ज्या कितीतरी वर्षापासून अक्षरशः पायांना अन्याय, अत्याचार,गुलामीच्या रूपाने जखडून ठेवलेल्या होत्या, अज्ञानातून त्या शृंखलाअजून घट्ट होत चालल्या होत्या त्यावर शिक्षण व ज्ञानाचा घाव घालून मोकळ्या केल्या. स्री फक्त चूल आणि मुलांपर्यंत मर्यादित नाही तर, एक दिव्यशक्ती आहे. ही शक्ती पुरुषांबरोबर त्यांच्या खांद्याला खांदा लावून प्रगती करू शकते याची ओळख जगाला पटवून दिली. स्त्रियांना शिक्षणरुपी मोकळा श्वास त्यांना घ्यायला शिकवला की ज्या श्वासाने तत्कालीन स्त्रियांबरोबर आजच्या स्त्रियांचे जीवन उजळून निघाले. त्यांचा परिणाम स्वरूप आजची स्री सर्वच क्षेत्रांमध्ये अग्रेसर आहे. आज जवळपास पावणे दोनशे वर्षांपूर्वीची स्थिती लक्षात घेता,स्री शिक्षण विरोधी समाजकंटकासमोर सावित्रीबाई स्वतः वनव्यासारख्या जळत होत्या मात्र त्या वनव्यातून प्रकाशाची वाटदाखवून आजच्या माता भगिनींना तेजस्वीसूर्यासारखे प्रखर व कणखर बनवले. कारण स्त्रियांनी शिक्षण घेणे म्हणजे धर्म बुडालाही बुरसट कल्पनाच त्यांनी मोडीस काढली.यामागील कपटनीती हिच की स्त्रियांना शिकविले तर त्यांना सत्याची जाणीव होईल व एकदा का स्त्रियांना सत्याची व खऱ्या धर्माची येथे धर्म म्हणजे हिंदू मुस्लिम वगैरे या अर्थाने नव्हे तर खरा धर्म म्हणजे मानवतेच्या आचरण पद्धतीची ओळख झाल्यास स्त्रियांवर लादल्या जाणारे सामाजिक बंधने,त्यांना गुलाम बनवण्याची तुच्छ स्वरूपाची खेळी उघडकीस येईल. केवळ अशा विचारहीन चालीरीतीं रूढी परंपरा व बुरसट कल्पना मोडीत काढण्यासाठी क्रांतीसुर्य ज्योतिबांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून सावित्रीबाईंना पदोपती सहकार्य केले. क्रांतीज्योती सावित्रीबाईंचा वयाच्या नव्या व ज्योतिबांचा तेराव्या वर्षी विवाह झाला त्यांना ज्योतिबांनी शिकविले आणि जेव्हा दोघांनी १ जानेवारी १८४८ ला पुणे येथे भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली तेथे शिक्षका म्हणून सावित्रीबाईंनी मुलींना शिकवण्याचे कार्य केले. सावित्रीबाई जेव्हा शाळेत शिकवायला जायच्या तेव्हा समाजकंटक त्यांच्यावर शेण फेकून मारायचे. एवढेच नाही तर अंगावर हात टाकायची भाषा करायचे,मात्र कणखर– तेजस्वी सावित्रीबाई डगमगल्या नाही त्यांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य सुरूच ठेवले. आजच्या काळात तत्कालीन संघर्षमय जीवन आपणास ऐकण्यास वाचनास सहज सुलभ वाटते,परंतु अशा विचारहीन रूढी परंपरा रुपी प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने ज्ञानदानाची नौका न डगमगता पार करणे तेवढे सोपे नव्हते.कल्पनेच्याही पलीकडची स्थितीहोती की ज्याची कल्पना डोळ्यासमोर आल्यास अंगावर शहारे आल्याशिवाय राहत नाही. आजची परिस्थिती लक्षात घेता अनेक शैक्षणिक संस्था,शाळा,महाविद्यालये गावोगावी सर्व जातीधर्मांसाठी विध्यार्थ्यांसाठी खुली आहेत. मुलगी जन्मल्यानंतर कोणत्याही शाळेत आपण शिक्षणासाठी तिला सहज दाखल करू शकतो. स्रीशिक्षणरुपी फळांचा व फुलांचा आस्वाद ज्या माता भगिनी आज ज्ञानरूपी शिक्षण संस्थेच्या बागेतून घेत आहे त्यासाठी सावित्रीबाई या माऊलीने अपार कष्ट व त्रास सहन केला. ज्ञानज्योती सावित्रीबाईंनी शैक्षणिक कार्याबरोबर स्त्रियांसाठी सामाजिक कार्य सुद्धा केले. बालविवाह प्रतिबंधक कायद्यासाठी ज्योतिबांबरोबर मोलाचे योगदान दिले.बालवयात विधवा झालेल्या मुलींना– महिलांना सती जावे लागायचे किंवा त्यांचे केसवपन करून कुरूप बनवल्या जायचे यातून पीडित महिलांची मुक्तता करण्यासाठी केशवपन पद्धतीचा विरोध केला.त्यांना सन्मानाने जगण्यासाठी त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. त्याचबरोबर विधवांचे पुनर्विवाह व्हावे यासाठी कार्य केले समाजकंटकांना चपराक म्हणून काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल दत्तक घेऊन यशवंत नाव ठेवले. सावित्रीबाई साक्षर झाल्यानंतर शिक्षिका, मुख्याध्यापिका म्हणून काम बघितले व त्याचबरोबर साहित्य लेखन सुद्धा केले. साहित्यातून स्री शिक्षणाची व अन्यायाविरुद्ध लढण्याची कास धरली. रूढी परंपरा वाईट सामाजिक जनरीती, चालीरितींचा कडाडून विरोध केला. महात्मा फुले यांच्या निधनानंतर सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाचे कार्य हाती घेतले व त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवला. ज्योतिबांची भाषणे,कार्य,विचार साहित्य लेखनाच्या माध्यमातून जगासमोर आणले. पीडित, दुखी, कष्टी महिलांना सन्मानाने जगता यावे, यासाठी सत्यशोधक कुटुंबात सहभागी करून घेतले. मात्र सण १८९६– ९७ च्या काळात प्लेग या साथीच्या आजाराने सर्वत्र धुमाकूळ घातली होती. या आजारातून कित्येकांचे बळी गेले. सर्वसामान्य गोर –गरिबांचे हाल लक्षात घेता, प्लेग पीडितांसाठी आरोग्याच्या सुविधा पुरवल्या.दवाखाना उभारला. प्लेगग्रस्त रोगी व त्यांच्या कुटुंबांना सावित्रीबाई मायेचा आधार देऊ लागल्या, परंतु प्लेग या साथीच्या रोगाने काळाचा घाला घातला व या अनाथाच्या मायमाऊलीस रोग्यांची सेवा करता– करता १० मार्च १८९७ रोजी मृत्यूने कवटाळले. क्रांतीज्योती सावित्रीबाईच्या कार्यास शतशः नमन व जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन....!

----------------

श्री.विनोद शेनफड जाधव,  
मासरूळ जि – बुलडाणा  
मो नं – ९७६३२८२०७७

# कोरफड की आवळा? केसांच्या वाढीसाठी उत्तम, डोक्यातील कोंडाही करेल दूर





कोरफड आणि आवळा हे दोन्ही केसांच्या वाढीसाठी खूप फायदेशीर मानले जातात. कोरफडमध्ये दाहक–विरोधी आणि मॉइश्चरायझिंग गुणधर्म असतात, जे केसांचे पोषण करतात आणि टाळूचे आरोग्य सुधारतात.

कोरफड आणि आवळा हे दोन्ही केसांसाठी आरोग्यदायी आहेत. कोरफडमध्ये दाहक–विरोधी आणि मॉइश्चरायझिंग गुणधर्म असतात, जे केसांचे पोषण करतात आणि टाळूचे आरोग्य सुधारतात. त्याचबरोबर दुसरीकडे, आवळा, व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्समध्ये समृद्ध आहे, जे केस मजबूत करतात आणि त्यांच्या वाढीस प्रोत्साहन देतात.

केसांची काळजी घेताना, नैसर्गिक उपाय सर्वात प्रभावी ठरतात. कोरफड आणि आवळा हे दोन्ही केसांसाठी आवडतात. हे दोन्ही केसांची निगा राखण्यात पूर्णपणे मदत करतात. पण केसांच्या वाढीला चालना देण्यासाठी या दोन्हींचा वापर केल्यास फायदा होतो. कोरफड आणि आवळा यांच्या वापराने केसांची वाढ चांगली होतेच डोक्यातील कोंडाही दूर होतो.

कोरफड आणि आवळ्यामधील गुणधर्म

कोरफड आणि आवळा हे दोन्ही केसांच्या वाढीसाठी खूप फायदेशीर मानले जातात. कोरफडमध्ये दाहक–विरोधी आणि मॉइश्वरायझिंग गुणधर्म असतात, जे केसांचे पोषण करतात आणि टाळूचे आरोग्य सुधारतात. दुसरीकडे, आवळा, व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्समध्ये समृद्ध आहे, जे केस मजबूत करतात आणि त्यांच्या वाढीस प्रोत्साहन देतात.

रेसिपी संबंधित बातम्या वाचण्यासाठी इथे क्लिक करा

परिणाम

कोरफड वेरा टाळूवर थंड प्रभाव प्रदान करते आणि कोंडा कमी करते. त्याचबरोबर आवळा केस काळे, दाट आणि चमकदार ठेवण्यास मदत करतो. दोन्ही एकत्र वापरल्याने चांगले परिणाम मिळू शकतात.

केसांची काळजी

कोरफड आणि आवळा हे केसांची काळजी घेण्यासाठी मास्क किंवा तेल म्हणून वापरले जाऊ शकतात. ते एकत्र लावल्याने केस मुळांपासून मजबूत होतात आणि नवीन वाढीस चालना मिळते. दोन्ही नैसर्गिक उपाय केसांसाठी सुरक्षित आणि प्रभावी आहेत.

निरोगी राहणे

कोरफड आणि आवळ्याचा नियमित वापर केल्याने केस गळणे, कोंडा आणि कोरडेपणा यासारख्या केसांच्या समस्या कमी होतात. कोरफड केसांना हायड्रेट करते आणि नैसर्गिक आर्द्रता राखते, तर आवळा केसांच्या मुळांना घट्ट आणि निरोगी बनवते.

आवळा

आवळा केसांसाठी फायदेशीर आहे यात शंका नाही. केसांचे आरोग्य राखण्यासाठी आणि केस लांब, दाट आणि सुंदर करण्यासाठी आवळ्याचा वापर केला जाऊ शकतो. आवळा लावण्यासाठी एका भांड्यात एलोवेरा जेल घ्या आणि त्यात आवळा रस लावा. १५ ते २० मिनिटे केसांवर राहू द्या आणि नंतर केस धुवा. काही दिवसांच्या वापरानंतर त्याचा परिणाम दिसून येईल.

खोबरेल तेल

हे दोन्ही मिसळून तयार केलेल्या हेअर मास्कमध्ये खोबरेल तेलाचे काही थेंब टाकल्यास केसांची ताकद वाढते. आठवड्यातून एकदा या मिश्रणाचा वापर केल्याने केसांना चमक तर मिळतेच शिवाय त्यांची वाढही वेगवान होते.

(टीप हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.)

# प्रा.किरणकुमार धिमधिमे यांना पीएच.डी प्रदान



केज/प्रतिनिधी–केज शहरातील सरस्वती महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख किरणकुमार मोहन धीमधीमे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर विद्यापीठाने समाजशास्त्र विषयात पीएच डी प्रदान केली. या यशाबद्दल माऊली विद्यापीठाचे अध्यक्ष अशोकराव पाटील ,खासदार रजनीताई पाटील, संस्थेचे सचिव आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे,संशोधक मार्गदर्शक डॉ. नवनाथ शिंदे, सरस्वती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.बी. पाटील,विजय शिनगारे ,डॉ.हनुमंत सौदागर, प्राध्यापक शिक्षणप्रेमी यांनी अभिनंदन केले आहे त्यांनी डॉ.नवनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक स्वराज्य संस्थेत मागासवर्गीय महिलांचा सहभाग आणि सबलीकरण विशेष संदर्भ बीड जिल्हा या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले.

## ना. पंकजाताई मुंडे यांच्या नावांचा उल्लेख करुन जातीय तेड निर्माण करु पहाणाऱ्या ज्ञानेश्वर इंगळे वर गुन्हा दाखल करा-केज तालुका भाजपा



केज/प्रतिनिधी–केज तालुक्यातील कळंबआंबा येथील रहिवासी ज्ञानेश्वर इंगळे यांनी दिनांक २ जानेवारी२०२५ रोजी आपहरण झाल्याचे कुंभाड रचुन महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या विषयी टक्केवारी देऊन कामे आणायची आहेत ,आसा सोशल मीडिया वर व्हिडिओ तयार करून पाठविलेला आहे, जातीय तेड निर्माण होईल असे वक्तव्य करणाऱ्या विरोधात कठोर कारवाई करावी असे निवेदन केज तालुका भाजपा च्या वतीने केज तहसीलदार यांना दिले आसुन या निवेदनावर ५० भाजपा कार्यकर्त्यांनी सह्या केल्या आहेत.

## रविवारी चाकूरात धनगर समाजाची जिल्हास्तरीय बैठक

चाकूर: लातूर जिल्ह्यातील धनगर समाजाची जिल्हास्तरीय बैठक रविवार दि ५ जानेवारी २०२५ येथिल शिवशक्ती बॅटरीज, नांदेड रोड चाकूर येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

धनगर समाजाच्या एसटी आरक्षणासंदर्भात लातूर जिल्ह्याच्या स्तरावरील बैठक चाकूर येथे आयोजित करण्यात आलेली आहे. बैठकीस जय मल्हार संघटनेचे प्रमुख लहुजी शेवाळे महिला प्रमुख रंजना बोरसे राम कांबळे मराठवाडा प्रमुख माणिकराव राऊत, सूर्यकांत भोसले, माधवराव साळुंखे ,शंकरराव शेळके , दिनकर बडोरे , प्रा. श्रीधर पाटील, हरिभाऊ काळे, माणिकराव अलोरे ,एल टी. केसाळे, शिवाजीराव शिंदे, माधव भिंगोले हे प्रमुख पदाधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.

लातूर जिल्ह्यातील सर्व धनगर समाजाच्या चळवळीतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने या बैठकीला उपस्थित राहावे असे आव्हान ओमप्रकाश नंदगावे, पांडुरंग लोकरे, नारायण राजुरे, अजित खंदारे, सुभाष काळे, संतोष गडदे , श्रीकांत हाके , तेजराव खटके , श्रीकृष्ण सुरवसे , आनंद देवकते, चंद्रकांत एनकफळे , महेश भिंगोले, गोपाळ म्हेत्रे ,सुरेश शेवाळे, नारायण काचे , राहुल किडीमुडी ,अजय मदने ,आकाश कुकर, शिवाजी आलोरे, नारायण धायगुडे, बाळू दिवटे यांनी केले आहे.

## लातूर येथे रविवारी विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय योजनांचा महामेळाव्याचे आयोजन

लातूर, दि. ०३ : नवी दिल्ली येथील राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, मुंबई येथील महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व लातूर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. लातूर येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूल समोरील लक्ष्मीप्रयाग बॅक्वेटस येथे हा कार्यक्रम होणार असून कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा लातूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती नीरज पी. धोटे यांच्या हस्ते होणार आहे.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा लातूर जिल्हा विधी व सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष व्ही. व्ही. पाटील, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहील.

# भारतीय बौद्ध महासभा केज च्या वतीने सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी




केज/प्रतिनिधी–भारतीय बौद्ध महासभा केज च्या वतीने सावित्रीबाई फुले यांची जयंती वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते लिंबराज बापु गायकवाड बालासाहेब जोगदंड,बापूसाहेब गायकवाड,सोनू गायकवाड, बळीराम सोनवणे, रंजीत घाडगे,आश्रुबा खरात यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. यावेळी बोलताना मान्यवर म्हणाले की, भारतातील पहिल्या महिला स्त्री शिक्षिका म्हणून सावित्रीबाई फुले यांची ओळख त्यांनी त्याकाळी असंख्य अडचणींना तोंड देत शिक्षणासारखे पवित्र कार्य केल्यामुळे निर्माण झाली. पुढे चालून भारत सरकारने त्यांच्या नावाने टपाल तिकीट काढून तसेच विद्यापीठाला त्यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्यामुळे सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा पाया निर्माण केला आहे आता फक्त आपल्याला त्यांच्या विचारावर चालून देश शिक्षणाच्या बाबतीत आणखीन मजबूत करावयाचा असून समाजातील प्रत्येक स्त्री ने केजी टू पीजी शिक्षण घेतल्याशिवाय आणि प्रगल्भ झाल्याशिवाय स्थिर बसू नये असे आव्हान मान्यवरांनी यावेळी कार्यक्रमा दरम्यान केले. कार्यक्रमाला असंख्य बंधू बांधवांची भगिनींची उपस्थिती होती.

## राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत सावित्रीबाई फूले जयंती उत्साहात साजरी



केज/प्रतिनिधी –स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.यांची तर प्रमुख उपस्थिती म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री.यादव व्हि.बी.तसेच श्रीमती ध्वजा गायकवाड व श्रीमती अनिता जाधव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.यांनी प्रतिमापुजन केले.ज्या माऊलीमुळे लेकींना शिक्षणाची दारे खुली झाली त्या सावित्रीबाई फूले यांना शाळेतील सर्वांनी कृतज्ञतापुर्वक अभिवादन केले.नंतर साने गुरुजी यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त आयोजित साने गुरुजी प्रश्न मंजुषा मध्ये सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमा निमित्त आयोजित भाषणांमध्ये शाळेतील छोट्या सावित्रीम्हणजेच विद्यार्थीनींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला व आपले मनोगत व्यक्त केले.

प्रमुख पाहुण्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फूले यांच्या जीवनातील प्रसंग सांगुन त्यांचा जीवनपट विद्यार्थ्यांसमोर मांडला,प्रतिकुल परिस्थिती मध्ये समाजाला सकारात्मक दिशेने नेण्यासाठी सावित्रीबाई यांचे योगदान त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषण करताना श्रीमती चाटे म्हणाल्या सावित्रीबाई केवळ महिलांना शिक्षण देऊन थांबल्या नाहीत.त्यांना सक्षम,धाडसी करण्यासाठी विविध रूढी परंपरांचा नायनाट करण्याचे कामही त्यांनी केले.सावित्रीबाईंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून अभ्यासात प्रगती करत राहा असेही त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.क्षीरसागर आर.एस.यांनी तर आभार श्री.देशमुख ए.डी.यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री.डिरंगे जी.बी.व मस्के जे.आर.यांनी मोलाचे सहकार्य केले.

## गुरु गणेश ग्रंथालयात वाचन पंधरवडा व सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी..




लातूर :– येथील गाव भागातील शासनमान्य श्री गुरु गणेश ग्रंथालय येथे शासनाच्या निर्देशाप्रमाणे वाचन पंधरवडाचे उद्घाटन माहेरवाशिणी अंजली बेदमुथा( बीड ),मंजू कोठारी( लासूर),अर्चना बाफना ( पुणे) व इतर महिला वाचकांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी सर्वप्रथम ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस सर्व उपस्थित माहेरवाशिणी नी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी महिला विषयक ग्रंथ साहित्याचे भव्य प्रदर्शन भरवण्यात आले.या प्रदर्शनाचे उद्घाटन याच सावित्रीच्या लेकीने केले.आपल्या मार्गदर्शनात ग्रंथालयाचे सचिव राजेश डुंगरवाल यांनी ग्रंथ,ग्रंथालय,वाचनाचे महत्व सवित्सर विषद करून दररोज कमीत कमी पुस्तकाचे एक पान तरी वाचले पाहिजे व वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी सर्वांनी सर्वोतपरी प्रयत्न करावे असे सांगितले.यावेळी सर्व माहेरवाशिनीचा व नवीन वाचक सभासदांचा ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथ भेट देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी सामूहिक वाचनही झाले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रंथपाल राम घोलप,दीप्ती कांबळे,महादेवी कांबळे,भरतबई बंडगर यांनी अथक परिश्रम घेतले

## मांडवी, इस्लापूर या नवीन तालुक्याचा पडला विसर तीन दशकांपासून मागणी शासनदरबारी प्रलंबितच?

किनवट/शेख शौकत :–महाराष्ट्रात एक नवा उदगीरच्या रूपाने ३७ वा जिल्हा मिळणार असल्याच्या चर्चाना उधाण आले आहे. मात्र नांदेड जिल्ह्याचे विभाजन करून मांडवी, इस्लापूर है दौन तालुके करून किनवट हा नवा जिल्हा निर्माण करावा, ही मागणी गेल्या तीन दशकांपासूनची आहे. मात्र शासन प्रशासन स्तरावर किनवटचा उल्लेख नसल्याने तालुक्यातील जनतेने नाराजी व्यक्त केली आहे. जिल्हा मुख्यालयापासुन किनवट हा आदिवासी तालुका दीडशे किलोमीटर अंतरावर आहे. जिल्ह्याशी निगडित सर्व कामे करण्यासाठी नांदेडला गेल्याशिवाय पर्याय नाही. नांदेड हे जिल्ह्याचे ठिकाण दूर अंतरावर असल्याने कोणतेही काम करण्यासाठी ग्रामीण भागातील जनतेला नांदेडला जायचे झाल्यास सकाळी उठून किनवट येथे जाऊन रेल्वे किंवा एसटी बसने नांदेडला जावे लागते. नांदेडचे काम करून परत घरी येण्यासाठी उशिरा रात्र होते. वेळप्रसंगी मुक्काम करावा लागतो. आर्थिक झळही सोसावी लागते. तसे पाहिले तर किनवट हा आदिवासी तालुका दुर्लक्षित आहे. किनवट जिल्ह्याचा विचार अद्यापही झाला नसल्याने राजकीय अनास्था कायम असल्याचे बोलले जात आहे.




मुख्यालय पासून २०० किलोमीटर अंतरावर आहे. किनवट तालुक्याचा विस्तार खूप मोठा आहे. उत्तर दक्षिण असा हा तालुक्याचा विस्तार असून किनवट तालुक्यातील पिंपळशेंडा गाय जिल्हा मुख्यालयापासून अथळपास २०० किलोमीटर अंतरावर आहे. हा मतदारसंघ लोकसभेत हिंगोली लोकसभा मतदारसंघात येतो. त्यामुळे नांदेडच्या राजकारण्यांचे किनवटकडे दुर्लक्ष होत आहे.

### :२६ जानेवारीला निर्मिती होणार का?

* किनवट तालुका पत्रकार संघाने मांडवी व इस्लापूर हे दोन तालुके करून किनवट जिल्हा करावा, अशी मागणी गत ३० वर्षांपूर्वी पासून केलेली आहे.

याशिवाय वेगवेगाळ्या सर्व संघटना, विविध पक्षांनी ही मागणीही केलेली आहे. मात्र अजूनही मांडवी व इस्लापूर हे दोन नवीन तालुके आणि किनवट जिल्हा करण्यासाठी शासन प्रशासनाकडून कोणत्याही हालचाली सुरू नसताना भाव उदगीर या नवीन जिल्ह्याच्या हालचाली वाढल्या आहेत. येत्या २६ जानेवारीला नवीन वर्षात किनवट जिल्ह्याची व मांडवी इस्लापूर या दोन तालुक्यांची निर्मिती होईल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची लातूर शहरांमध्ये भव्य मिरवणुकीने जयंती साजरी.




लातूर :– क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क येथिल महात्मा जोतीराव फुले पुतळा स्मारकासमोर त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बहुजन महिला हक्क श्रमिक संघटना आणि ऋ– २४ च्या वतीने लोकशाहिर अण्णाभाऊ साठे चौकातून महिलांची रॅलीची सुरूवात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना पुष्पहार अर्पण करून झाली.त्यानंतर गंजगोलाई मार्गे महात्मा गांधी यांना पुष्पहार अर्पण करून गांधी चौकातून, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले व महात्मा जोतीराव फुले पुतळा स्मारक येथे त्यांना व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी ऋ–२४ चे नरसिंग घोडके,श्रीधर शेवाळे,डी.उमाकांत,रामराजे आत्राम,ड.किरण कांबळे,डीएस. नरसिंगे,समता परिषदेचे पद्माकर वाघमारे,भारत काळे,नागनाथ पोलकर,बहुजन महिला हक्क श्रमिक संघटनेच्या अध्यक्षा लक्ष्मीबाई कांबळे,महानंदा शेवाळे,पार्वती लोखंडे,आशा गाडे,शालू मगर,पुनम गव्हाणे,अन्नपुर्णा नामवाड,अश्विनी कांबळे,लक्ष्मी घोडके,सरस्वती मगर यांच्यासह अनेक महिला व पुरूष सहभागी झाले होते.

## कामाच्या ठिकाणी महिलांकरिता सुरक्षित वातावरण निर्माण करणे प्रत्येकाची जबाबदारी–विजया रहाटकर

लातूर, दि. ०३ : प्रत्येक शासकीय, अशासकीय कार्यालयांमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित वातावरण निर्माण होणे आवश्यक आहे. याविषयी कार्यालयातील प्रत्येक सहकाऱ्याची जबाबदारी महत्वाची असल्याचे राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी सांगितले. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत कार्यालयांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या अंतर्गत तक्रार निवारण समिती अध्यक्ष सदस्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जावेद शेख यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

काही वेळा महिलांना कामाच्या ठिकाणी त्रासाला सामोरे जावे लागते, त्यांचा लैंगिक छळ होतो. मात्र त्या तक्रार करायला धजावत नाहीत. महिलांसाठी प्रत्येक कार्यालयात सुरक्षित वातावरण निर्माण होण्यासाठी, तसेच त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी कार्यालय प्रमुख, कार्यालयातील सहकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे श्रीमती रहाटकर म्हणाल्या. महिलांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी अंतर्गत तक्रार निवारण समित्यांची दर तीन महिन्यांनी आढावा बैठक घ्यावी. या समितीचे सदस्य म्हणून काम करणाऱ्या प्रत्येकाने समितीला मिळालेल्या अधिकाराचा वापर करून महिलांना न्याय द्यावा. तसेच महिलांवर तक्रार करण्याची वेळ येणार नाही, असे वातावरण कार्यालयात निर्माण करावे, असे त्या म्हणाल्या. यासोबतच असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांसाठी गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय स्थानिक तक्रार निवारण समितीबाबत जनजागृती करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.लातूरमधील हिरकणी कक्ष, 'डायल ११२' क्यूआर कोड संकल्पना सर्वत्र राबविणारलातूर जिल्हाधिकारी कार्यालयात तयार करण्यात आलेल्या हिरकणी कक्षाचे, तसेच पोलीस दलामार्फत शहरातील रिक्षांमध्ये लावण्यात आलेल्या 'डायल ११२' विषयक क्यूआर कोड उपक्रमाचे श्रीमती रहाटकर यांनी कौतुक केले. तसेच हे दोन्ही उपक्रम देशात सर्वत्र राबविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे श्रीमती विजया रहाटकर यांनी सांगितले. तसेच लातूर येथील सखी वन स्टॉप सेंटरने महिलांच्या जवळपास १ हजार तक्रारींचा निपटारा केला असून या कक्षाचे काम समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE